MHSO140006722010

दाखल तारीखः- ३०/१२/२०१०

नोंद तारीखः- ३०/१२/२०१०

निकाल तारीखः- ०९/०४/२०२६

कालावधीः१५ वर्षे ०३ महिने१० दिवस

| | | |
|---|---|---|
| | **मे. जी. एस. पाटील यांचे न्यायालयात**<br>**सध्या – प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ता.बार्शी, जि. सोलापूर**<br>**(न्यायनिर्णय दिनांक ०९ एप्रिल, २०२६)**<br>**(नियमित फौजदारी खटला क्र. ८२६/२०१०) नि.क्र.६४** | |
| | (एफ.आय.आर/गुन्हा नं. ८८/२०१० बार्शी शहर पोलीस स्टेशन) | |
| तक्रारदार /<br>अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे बार्शी शहर, ता. बार्शी, जि. सोलापूर. |
| व्दारे प्रतिनिधित्व | | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. आर.बी. काजळे. |
| आरोपी | | **१. संजय माणिक पवार, (मयत)**<br>२. निहाल विष्णु व्हनकळस,<br>वय- ४३ वर्षे, व्यवसाय- मजुरी,<br>रा. तानाजी चौक, बार्शी, जि. सोलापूर<br>३. कुणाल उत्तमप्रकाश खंदारे,<br>वय- २९ वर्षे, व्यवसाय- मजुरी,<br>रा. झाडबुके मैदान, बार्शी, जि. सोलापूर |
| व्दारे प्रतिनिधित्व | | विधिज्ञ आरोपी क्र.२ तर्फे श्री. ए. आर. पाटील.<br>विधिज्ञ आरोपी क्र.३ तर्फे श्री. एस. जी. झालटे. |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १७/०४/२०१० |
| एफ.आय.आर तारीख | १७/०४/२०१० |
| आरोपपत्राची तारीख | ३०/१२/२०१० |

| | |
|---|---|
| दोषारोप तारीख | २४/०७/२०२५ |
| पुरावा सुरवात तारीख | २४/०७/२०२५ |
| निकाल राखुन ठेवला ती तारिख | --- |
| निकालाची तारिख | ०९/०४/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | --- |

**आरोपी तपशिल**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारिख | जामिनावर सुटकेची तारिख | दोषारोप | जर निर्दोष अथवा दोषी असेल तर | शिक्षा ठोठावलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम ४२८ चे उद्देशाने खटल्या दरम्यान कोठडी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | निहाल विष्णु व्हनकळस | १९/०४/२०१० | १९/०४/२०१० | भा.द.वि. कलम १४३, १४७ सहकलम १४९ म.सा.मा.वि प्रति अधि का. कलम ३ व ७ व मु.पो.का कलम १३५ प्रमाणे | निर्दोष | -- | -- |
| ३. | कुणाल उत्तमप्रकाश खंदारे | ०४/०७/२०१० | ०५/०७/२०१० | वरीलप्रमाणे | निर्दोष | -- | -- |

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा.१ | नरेंद्र भारत माने (नि.क्र.४५) | घटनास्थळ पंच |

| | | |
|---|---|---|
| अ.सा.२ | प्रभुलिंग शरणय्या हिरेमठ (नि.क्र.४७) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा.३ | महादेव दत्तात्रय ढगारे (नि.क्र.४८) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा.४ | राजु बबन मस्तुद (नि.क्र.५३) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा.५ | अमोद रामचंद्र भुजबळ (नि.क्र.५७) | तपासीक अंमलदार |

**ब. बचावपक्षाचा साक्षीदारः नाही.**

**क. न्यायालयीन साक्षीदारः नाही.**

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदार निशाणी यादी**

**अ. अभियोगपक्षः**

| अ. क्रं | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १) | निशाणी क्र.४६ | घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदाराची सही |

**ब. बचावपक्ष : तपासले नाही.**

**क. न्यायालयीन निशाणीः नाही.**

**ड. मुद्देमाल क्रमांक : नाही.**

## <u>न्यायनिर्णय</u>

## (घोषित दिनांक ०९ एप्रिल, २०२६)

१. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी क्र.१ ते ३ यांचेविरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, १४७ सहकलम १४९, महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३ व ७ व मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये दंडनीय अपराध केल्याच्या आरोपाखाली फौजदारी खटला चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची हकीकत पुढीलप्रमाणे अशी आहे की,**

फिर्यादी सर्जेराव दगडू सांगळे, रा.अरणगांव रोड, संभाजी नगर, बार्शी, ता. बार्शी हे पत्नीसह राहण्यास असून बार्शी आगार येथे एस.टी.ड्रायव्हर म्हणून नोकरी करुन उदरनिर्वाह करतात. दिनांक १७/०४/२०१० रोजी सायंकाळी ०५:०० वाजता फिर्यादी व वाहक सुर्यभान सुरवसे यांनी बस क्र. एमएच–१२–एआर–९५५४ घेवून खडकोणी करीता निघाले. खडकोणी येथे सायंकाळी ०६:१५ पोहोचले व सायंकाळी ०६:२० वाजता परत बार्शी येथे येणेकरीता

निघाले. सुमारे ०७:१५ वाजता त्यांची एस.टी. हिरेमठ हॉस्पीटल, बार्शी समोर आली असता, समोरुन ८ ते १० लोकांचा जमाव हातात काठ्या व दगड घेवून येताना दिसला. सदरचा जमाव त्यांच्या एस.टी च्या दिशेने आला व त्यांच्या हातातील दगडे त्यांनी सदर एस.टी. च्या समोरील काचेवर फेकली. त्यामुळे एस.टी.चे समोरची व दोन्ही साईडच्या काचा फुटल्या. त्यामुळे सदर एस.टी.चे सुमारे रु. ५,०००/– चे नुकसान झाले. त्यातील एक दगड फिर्यादीच्या डावे हाताचे मनगटावर येवून लागला. त्यामुळे फिर्यादीस त्या ठिकाणी सुज आली. एस.टी चे बाजूस असलेली टेम्पो एमएच–१२–इएफ–३४६२ या गाडीवर देखील जमावाने दगड फेक करुन काचा फोडून गाडीचे ३०००/– रुपयांचे नुकसान केले. फिर्यादी एस.टी. थांबवून खाली उतरले तेव्हा सदरचा जमाव पळून गेला. सदर पळून गेलेल्या लोकांबद्दल आजूबाजूस चौकशी करता त्यातील आरोपी क्र.१ कुणाल खंदारे, २. संजय माणिक पवार, ३. सुहास मोरे व आरोपी क्र.४ निहाल विष्णू व्हनकळस या लोकांची नावे समजली. त्यावरुन गु.र.नं.८८/२०१० प्रमाणे आरोपींविरुध्द बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.

३. याकामी श्री.ए. आर. भुजबळ, बार्शी शहर पोलीस स्टेशन यांनी तपासकाम केले आणि घटनास्थळ पंचनामा करुन साक्षीदारांची तपास टिपणे नोंदवून आरोपींविरुध्द भा.द.वि. कलम १४३, १४७ सहकलम १४९, महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३ व ७ व मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. सदर खटल्यातील आरोपी क्र.१ हे संपरिक्षेदरम्यान मयत झाल्याने त्यांना सदर खटल्यातून वगळण्यात येत आहे. तसेच आरोपी क्र.२ व ३ विरुध्द निशाणी क्र.४० व ४३ वर भा.द.वि. कलम १४३, १४७ सहकलम १४९, महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३ व ७ व मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये दोषारोप नोंदविण्यात आला व त्यांना तो त्यांच्या बोली भाषेतून वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपींनी नि.क्र.४१ व ४४ अन्वये गुन्ह्याची कबुली न देता खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५. प्रस्तूत प्रकरणातील वस्तूस्थितीवरुन माझे विचारार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणासहीत पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करते का की, दिनांक १७/०४/२०१० रोजी सायंकाळी ०७.४५ वाजण्याच्या सुमारास, सुभाषनगर, बार्शी येथे हिरेमठ हॉस्पीटल रोडजवळ, त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशीर जमाव केला व त्यानुसार त्यांनी भारतीय दंड विधान संहितेचे कलम १४३ सहकलम १४९ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | नाही. |
| २. | अभियोगपक्ष हे सिध्द करते का की, वरील नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी एस.टी. व टेम्पो वर दगडफेक करुन दंगा केला आणि त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम १४७ सहकलम १४९ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | नाही. |
| ३. | अभियोगपक्ष हे सिध्द करते का की, वरील नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी एस.टी.बस क्र. एमएच–१२–एआर–९५५४ आणि टेम्पो टाटा एस क्र. एमएच–१२–ईएफ–३४६२ याच्यावर दगडफेक करुन सार्वजनिक मालमत्तचे नुकसान केले व महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३ व ७ अन्वये गुन्हा केला ? | नाही. |
| ४. | अभियोगपक्ष हे सिध्द करते का की, वरील नमूद दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी मा. जिल्हादंडाधिकारी सोलापूर यांचा मुंबई पोलीस अधिनियम कलम ३७(१) प्रमाणे योग्यपणे प्रसारीत व प्रचार केलेल्या जमावबंदी व शस्त्रबंदी आदेशाचा भंग केला व त्यानुसार त्यांनी पोलीस अधिनियम कलम ३७(१) सहकलम १३५ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | नाही. |
| ५. | हुकूम काय ? | आरोपी क्र.२ व ३ यांना निर्दोष मुक्त |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात येते. |

६. प्रस्तुत प्रकरणात सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तोंडी विनंतीवरुन पुरावा बंद करण्यात आले. आरोपींविरुध्द पुरावा आढळून आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले.

७. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला की, योग्य त्या गुणदोषांवर सदर खटल्याचा निकाल व्हावा. आरोपींतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी आरोपींविरुध्द अभियोगपक्षाने संशयापलीकडे आरोप शाबीत केलेले नसल्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ साठी**

**मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांच्यावरील कारणीमीमांसा एकत्र चर्चिले आहेत.**

८. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुध्द भा.द.वि. कलम १४३, १४७ सहकलम १४९, महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३ व ७ व मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेले आहे. सदर गुन्हा शाबीत करण्याकरिता अभियोगपक्षाने प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंच साक्षीदार क्र.१ नरेंद्र भारत माने यांना साक्षीदार म्हणून तपासले आहे. सदर साक्षीदार यांनी त्यांचे पुराव्यादरम्यान असे सांगितले की, दिनांक १८/०४/२०१० रोजी सहा.पोनि. ए. आर. भुजबळ यांनी बोलविले होते हे साक्षीदारास माहित नाही व साक्षीदार त्यांचेकडे गेले नव्हते. बार्शी येथील आगळगावला जाणारे रोडवर हिरेमठ हॉस्पीटलजवळ जयभवानी विविध वस्तु दुकान येथे साक्षीदारास बोलविले नव्हते. घटनास्थळ पंचनामेवरील सही (नि.क्र.४६) साक्षीदाराची आहे. साक्षीदारास पंचनामेसाठी बोलविले होते असे काही झाले नाही. सदर साक्षीदार यांनी अभियोगपक्षास प्रतिकुल साक्ष न दिल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासणी स्वरुपातील प्रश्न विचारले. परंतु साक्षीदाराने उलटतपासातील सर्व उत्तर सुचक प्रश्न साक्षीदाराने नाकारले आहे. साक्षीदाराने त्याच्या पंचनामेवरील सही मान्य केलेली आहे. त्यामुळे साक्षीदाराने

आरोपींविरुद्ध गुन्हादर्शक कथन केलेले नाही.

९. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.२ प्रभुलिंग शरणय्या हिरेमठ (नि.क्र.४७) यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, सन २०१० साली साक्षीदाराचे दुकान सुभाष नगर येथे होते. दिनांक १७/०४/२०१० रोजी काय झाले होते हे साक्षीदारास माहित नाही. साक्षीदार दुकानला सकाळी ८:३० वाजता येवून रात्री ८:०० वाजता परत जात होते. सदर दिवशी साक्षीदार दुकानामध्ये हजर असताना त्यांच्या ओळखीचे संजय पवार, निहाल व्हनकळस, कुणाल खंदारे हे आरोपी व इतर चार मुले आरडाओरडा करत आले व गाडयावर दगड फेक केली असे काही झाले नाही. सदर साक्षीदार यांनी अभियोगपक्षास प्रतिकुल साक्ष न दिल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासणी स्वरुपातील प्रश्न विचारले. परंतु साक्षीदाराने उलटतपासातील सर्व उत्तर सुचक प्रश्न नाकारलेले आहे. त्यामुळे साक्षीदाराने आरोपींविरुद्ध गुन्हादर्शक कथन केलेले नाही.

१०. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.३ महादेव दत्तात्रय ढगारे (नि.क्र.४७) यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, सन २०१० साली साक्षीदाराचे दुकान सुभाष नगर येथे होते. साक्षीदाराचे दुकानाचे नाव जय भवानी होते. साक्षीदार सकाळी ७:३० ते संध्याकाळी ८:३० वाजेपर्यंत दुकानी असतात. दिनांक १७/०४/२०१० रोजी काय झाले होते हे साक्षीदारास माहित नाही. सदर दिवशी साक्षीदार दुकानामध्ये हजर असताना सायंकाळी त्याच्या ओळखीचे कुणाल, संजय, निहाल व इतर चार ते सहा इसम आरडाओरडा करत आले व त्यांनी त्यांच्या हातातील दगड घेवून रस्त्यावर येणार जाणारे गाडयावर दगड फेक केली असे काही झाले नाही. सदर साक्षीदार यांनी अभियोगपक्षास प्रतिकुल साक्ष न दिल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासणी स्वरुपातील प्रश्न विचारले.परंतु साक्षीदाराने उलटतपासातील सर्व उत्तर सुचक प्रश्न साक्षीदाराने नाकारले आहे. त्यामुळे साक्षीदाराने आरोपींविरुद्ध गुन्हादर्शक कथन केलेले नाही.

११. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले प्रत्यक्षदर्शी साक्षीदार क्र.४ राजु बबन मस्तुद (नि.क्र.५३) यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, सन २०१० साली साक्षीदार मजुरी

करत होते. दिनांक १७/०४/२०१० रोजी काय घडले होते हे साक्षीदारास माहिती नाही. आरोपी कुणाल खंदारे, संजय पवार, ज्ञानेश्वर व्हनकळस हे आरडाओरडा करत हिरेमठ हॉस्पीटलसमोर आले असे काही घडले नाही. सदर साक्षीदार यांनी अभियोगपक्षास प्रतिकुल साक्ष न दिल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासणी स्वरुपातील प्रश्न विचारले.परंतु साक्षीदाराने उलटतपासातील सर्व उत्तर सुचक प्रश्न साक्षीदाराने नाकारले आहे. त्यामुळे साक्षीदाराने आरोपींविरुद्ध गुन्हादर्शक कथन केलेले नाही.

१२. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले तपासीक अंमलदार साक्षीदार क्र.५ अमोल रामचंद्र भुजबळ (नि.क्र.४७) यांनी त्यांच्या पुराव्यात सांगितले की, सन २०१० साली साक्षीदार ए.पी.आय या पदावर बार्शी शहर पोलीस ठाणे येथे कार्यरत होते. दिनांक १७/०४/२०१० रोजी ठाणे अंमलदार ए.एस.आय घनाते यांनी गु.रं.८८/२०१० भा.द.वि कलम १४३, १४७, १४९ व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करुन तपास साक्षीदाराकडे सोपवला. त्यानंतर सदर साक्षीदार यांनी गुन्हयाची कागदपत्रे बघितली आणि दुस–या दिवशी १८ तारखेला घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ हिरेमठ हॉस्पीटल समोर होते. घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.५८) मधील मजकूर खरा व बरोबर आहे. सदर साक्षीदाराने इतर साक्षीदाराचे जाब जबाब नोंदविले. गुन्हयातील दोन आरोपींना अटक केली. तपासाअंती आरोपींनी गुन्हा केल्याचे पुरावे समोर आल्याने आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केली. साक्षीदार क्र.२, ३ व ४ यांचा जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात आलेला आहे. सदर साक्षीदाराचा आरोपीतर्फे उलटतपास घेण्यात आला. साक्षीदाराने उलटतपासादरम्यान हे मान्य केले आहे की, कोणत्या साक्षीदाराकडून आरोपींची नावे समजली हे साक्षीदाराने तपासात घेतलेले नाही. साक्षीदार यांनी उलटतपासात हे अमान्य केले आहे की, नरेंद्र माने व सचिन माने व त्यांच्या पोलीस स्टेशनचे सराईत पंच आहेत. (नि.क्र. ५८) घटनास्थळ पंचनामेमध्ये वरती जागा सोडून खाली घटनास्थळ पंचनामा तयार केलेला आहे. त्यानंतर पंचांची नावे टाकून सह्या घेतलेल्या आहेत व सदर पंचनामामध्ये जागा सोडलेली आहे. उलटतपासादरम्यान साक्षीदारास एस.टी चा क्रमांक आठवलेला नाही. तसेच हिरेमठ हॉस्पीटलचा रस्ता साधारण १ कि.मी चा आहे याबद्दल साक्षीदारास सांगता आलेले नाही.

१३. अभियोग पक्षाने एकूण पाच साक्षीदार तपासलेले आहेत. अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. सदर खटल्याअंतर्गत फिर्यादी हे मयत आहेत. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र.२, ३ व ४ यांनी घटना नाकारलेली आहे. तसेच अभियोग पक्षातर्फे घटनास्थळ पंच या साक्षीदाराने घटनास्थळ पंचनामा त्यांच्यासमक्ष करण्यात आला होता ही बाब नाकारलेली आहे. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले तपासीक अंमलदार यांनी गुन्ह्याचा तपास करुन आरोपींविरुध्द पुरावा आल्याने दोषारोप पत्र दाखल केले असे त्यांच्या तोंडी पुराव्यामध्ये कथन केलेले आहे. तपासीक अंमलदार यांनी अभियोग पक्षाच्या हकीकतीस समर्पन देणारी अशी साक्ष दिली असली तरी आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सदर साक्ष सक्षम आहे असे मानता येणार नाही. अभिलेखावरील पुरावांचा उहापोह करता, आरोपी यांनी दिनांक १७/०४/२०१० रोजी बेकायदेशीर जमाव जमवून हातात दगड घेवून ते दगड एस.टी बस क्र. एमएच–१२–एआर–९५५४ व टेम्पो टाटा एस क्र.एमएच–१२– इएफ–३४६२ या गाड्यांवर दगड फेकून गाड्ंयाच्या काचांचे फोडून सुमारे ८०००/– रुपयांचे नुकसान केले. तसेच प्रसारीत केलेल्या जमाव बंदी शस्त्र बंदी आदेशाचा भंग केला व त्याप्रमाणे सदर आरोपी यांनी भारतीय दंड विधान कलम १४३, १४७ सहकलम १४९, महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३ व ७ व मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये दंडनीय अपराध केला ही बाब संशयाच्या पलीकडे जावून सिध्द होवू शकलेली नाही.

१४. उपरोक्त सर्व कारणमीमांसा ध्यानात घेता अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द दोषारोप ठेवलेल्या गुन्हयाचे मुलभूत घटक शाबीत केलेले नाहीत म्हणून असा निष्कर्ष काढण्यात येतो की, आरोपींनी भारतीय दंड विधान कलम १४३, १४७ सहकलम १४९, महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३ व ७ व मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे गुन्हा केलेला आहे ही बाब शाबीत करण्यास अभियोगपक्षास अपयश आलेले आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ४ करिता नकारार्थी निष्कर्ष देत आहे.

**<u>मुद्दा क्र.५ साठी</u>**

१५. फौजदारी प्रकरणामध्ये आरोपीचा गुन्हा शाबीत करण्याची जबाबदारी

अभियोगपक्षाची असते. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींचा गुन्हा शाबीत करण्याकरिता अभियोगपक्षाने प्रत्यक्षदर्शी असा विश्वासाहर्य पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द दोषारोप ठेवलेले गुन्हे साशंकतेच्या पलिकडे शाबीत करण्यास अभियोगपक्षास अपयश आलेले आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ४ वर नोंदविलेले निष्कर्ष व त्यावरील कारणमीमांसा ध्यानात घेता, अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द दोषारोप ठेवलेले गुन्हे सिध्द केलेले नाहीत. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करणे गरजेचे आहे. सबब मुद्दा क्र. ५ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.२ निहाल विष्णु व्हनकळस, आरोपी क्र. ३ कुणाल उत्तमप्रकाश खंदारे, यांना भारतीय दंड विधान कलम १४३, १४७ सहकलम १४९, महाराष्ट्र सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३ व ७ व मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी क्र.१ संजय माणिक पवार हे मयत झाल्याने त्यांचे सदर खटल्यातील नाव कमी करण्यात आलेले आहे.

३. आरोपी क्र. २ व ३ यांचे जातमुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

४. आरोपी क्र.२ व ३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे, अपिलीय न्यायालया समोर हजर राहण्यासाठी, प्रत्येकी रु. १५,०००/– वैयक्तिक जातमुचलक्याची पुर्तता करावी.

५. या न्यायनिर्णयाची प्रत फिर्यादी यांना संबधीत जिल्हाधिकारी यांचे मार्फत फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३६५ प्रमाणे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Sd/-

(श्रीमती गायत्री एस. पाटील)

दिनांकः– ०९/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, बार्शी.

# **CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | K. S. Naik (Grade III) |
| (b) | Court | : | Smt. G.S. Patil,<br>2nd Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 09/04/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 09/04/2026 |